Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Riviera Beach, FL 33404
lalitagandbhir@hotmail.com

# माझा सखा

तू माझं संगीत
तू माझं नाटक आणि सिनेमा
तुझ्या पानांवर कोरलाय
माझा हिशोब
मी लिहिलेली पत्रं आणि कथा

मी घेतलेले फोटो
माझी भूतकालीन व भविष्यकालीन दिनपत्रिका
माझा रक्तताब, माझ्या रक्तातील साखर
माझ्या ह्रदयाची गती
माझ्या औषधांची यादी

माझ्या मित्रमंडळींचे व नातेवाईकांचे
नांव, पत्ते व फोन नंबरस्

तू मला मार्गदर्शन करतोस
विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देतोस

क्षणार्धात माझे निरोप सातासमुद्रापलीकडे पोचवतोस

मुठीएवढा जीव तुझा

तरीही तू माझ्या हृदयाची

धडकन् झालायस

x x x x x

एकच प्रश्न मनात उभा राहतो

तू अस्तित्वात येण्यापूर्वी

मी कशी जगत होते!